**Anekant Education Society's**

# Tuljaram Chaturchand College, Baramati

***(Autonomous)***

**Two Year Degree Programme in Marathi**

**(Faculty of Arts)**

**CBCS Syllabus**

**M.A. (Marathi) Part-I Semester -II**

**For Department of Marathi**

**Tuljaram Chaturchand College, Baramati**

**Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)**

**(As Per NEP 2020)**

**To be implemented from Academic Year 2023-2024**

**Title of the Programme: M.A.(Marathi )**

## Preamble

AES's Tuljaram Chaturchand College has made the decision to change the syllabus of across various faculties from June, 2023 by incorporating the guidelines and provisions outlined in the National Education Policy (NEP), 2020. The NEP envisions making education more holistic and effective and to lay emphasis on the integration of general (academic) education, vocational education and experiential learning. The NEP introduces holistic and multidisciplinary education that would help to develop intellectual, scientific, social, physical, emotional, ethical and moral capacities of the students. The NEP 2020 envisages flexible curricular structures and learning based outcome approach for the development of the students. By establishing a nationally accepted and internationally comparable credit structure and courses framework, the NEP 2020 aims to promote educational excellence, facilitate seamless academic mobility, and enhance the global competitiveness of Indian students. It fosters a system where educational achievements can be recognized and valued not only within the country but also in the international arena, expanding opportunities and opening doors for students to pursue their aspirations on a global scale.

In response to the rapid advancements in Arts the evolving approaches in various domains of Marathi and related subjects, the Board of Studies in Marathi at Tuljaram Chaturchand College, Baramati - Pune, has developed the curriculum for the first semester of M.A. Part-I Marathi , which goes beyond traditional academic boundaries. The syllabus is aligned with the NEP 2020 guidelines to ensure that students receive an education that prepares them for the challenges and opportunities of the 21st century. This syllabus has been designed under the framework of the Choice Based Credit System (CBCS), taking into consideration the guidelines set forth by the National Education Policy (NEP) 2020, LOCF (UGC), NCrF, NHEQF, Prof. R.D. Kulkarni's Report, Government of Maharashtra's General Resolution dated 20th April and 16th May 2023, and the Circular issued by SPPU, Pune on 31st May 2023.

# पदवी व पदव्युत्तर मराठी : ठळक वैशिष्ट्ये

भाषा, साहित्य व विविध कलांच्या माध्यमातून होणारे विविध आविष्कार यांचा अभ्यास करणारी विद्या शाखा म्हणून कला शाखा ओळखली जाते. मराठी विषयाची पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी जीवन जगण्यासाठी विविध प्रकारची कौशल्ये अवगत करू शकेल. साहित्य आणि भाषेच्या ज्ञानामुळे विद्यार्थ्याला करिअरच्या विविध वाटा सुलभ होतील. भाषा व साहित्याच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची जीवनदृष्टी विकसित होईल व त्याला जीवन जगण्यास बळ मिळेल. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. असा विद्यार्थी एक समर्थ, सुसंस्कृत व भाषासंपन्न नागरिक बनू शकेल. निरामय समाजनिर्मितीसाठी हे महत्वाचे आहे. सध्याच्या काळात समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी - गुणवत्तापूर्ण व प्रगत जीवन जगता येण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, नैतिकमूल्यांचे अधिष्ठान असणे व ज्ञानवृद्धीसाठी नाविण्यपूर्ण व कौशल्याधिष्टित अभ्यासक्रम देणे हाच एकमेव मार्ग आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 च्या निर्देशानुसार तर भाषाभ्यासाची नवनवीन तंत्रे विद्यार्थी आत्मसात करतीलच. तसेच प्रसार माध्यमातील विविध सर्जनशील संधी प्राप्त करण्यास विद्यार्थ्यांना मदत होईल. साहित्याची भाषा, व्यवहाराची भाषा आणि शास्त्रीय वाङ्मयाची  भाषा यातील फरकही विद्यार्थ्यांना समजेल. त्यांचे जीवनाकडे पाहण्याचे परिप्रेक्ष्य विस्तारेल. निवेदक, सूत्रसंचालक, मुलाखतकार, जनसंपर्क अधिकारी, पटकथा लेखक, मुद्रित शोधक, संपादक, वार्ताहर, स्तंभलेखक, माध्यम संवादक, प्रकल्प लेखक, अनुवादक, भाषांतरकार, प्रकाशक, लेखक, नाटककार, अशा भाषा व साहित्याशी संबंधित असंख्य संधी विद्यार्थ्यांना खुणावत आहेत. त्या सदर अभ्यासक्रमातून उपलब्ध होतील, त्या दृष्टीने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात मूलभूत बदल करण्यात आलेले आहेत. मराठी भाषेचे सर्जनशील उपयोजन, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक मराठीचे व्याकरण, मराठी भाषेची विविध कौशल्ये, मराठी भाषेचे संगणकीय उपयोजन, आधुनिक व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी लेखन, व्यावसायिक व माहितीपर लेखन, भाषांतर, रूपांतर, अनुवाद, वाङ्मयव्यवहार व प्रकाशन व्यवसाय, शब्दांकन इ. विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे. साहित्य आणि भाषेच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांच्या अधिष्ठान अभ्यासाचा पाया पक्का होईल व विद्यार्थी साहित्य आणि समाजाच्या सहसंबंधाचे आकलन करू लागेल. त्यातून त्यांची समाजाकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टी विकसित होईल.

साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा, लेखक कवींची व्यक्तित्वे, साहित्यकृती, साहित्यिक, साहित्याची वैशिष्ट्ये, भारतीय साहित्य विचाराचा परिचय, भाषाविज्ञान, साहित्यकृतींचा संहितानिष्ठ अभ्यास, समीक्षा विचार व साहित्य संशोधन, वाङ्मयप्रकाराची संकल्पना, ग्रामीण व दलित साहित्य प्रवाह, स्त्रीवादी साहित्य प्रवाह, आदिवासी साहित्य प्रवाह, प्राचीन व अर्वाचीन विशेष लेखकाचा अभ्यास, साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास, साहित्याचे आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन, पदवी पातळीवरील संशोधन, व्यावहारिक व उपयोजित मराठी, प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये, समकालीन समाज इ. विषयांशी विद्यार्थी परिचित होईल. भाषेचे विविध व्यवहार आणि साहित्याच्या संदर्भातील भाषा व्यवहार याविषयी विद्यार्थ्यांची आकलनाची क्षमता निश्चितच वाढेल. लेखन- संपादन, भाषांतर- लेखन, रूपांतर, जाहिरात लेखन, पटकथा लेखन यासंबंधीच्या लेखन प्रकारांत विद्यार्थी पारंगत होईल . वक्तृत्व कला, संभाषण कौशल्ये, प्रासंगिक लेखन या प्रकाराबद्दल चे ज्ञान विद्यार्थी अवगत करतील.

मानवाने निर्माण केलेल्या भाषा, विविध बोलींचा अभ्यास त्यातील संदेश व्यवहार हे मराठी भाषेचे अभ्यासक्षेत्र आहे. मानवी मनाचा आणि प्रतिभेचा कल्पकतापूर्ण आविष्कार तसेच नीतीमूल्यांचा अभ्यास, वाङ्मयीन मूल्ये आणि जीवन मूल्यांचा अभ्यास, माणसाच्या नैतिक व सौंदर्य मूल्यांविषयीचा अभ्यास विद्यार्थी करू लागेल, साहित्य, चित्रकला, वास्तुकला व ललित कला तसेच नाट्य, संगीत, नृत्य, चित्रपट या प्रयोगाधिष्ठित कला जगभरातील मानवी संस्कृतीचा पोत जाणून घेणाऱ्या कला आहेत, या कलांचा विशेष अभ्यास करण्याची क्षमता विद्यार्थी मिळवू शकेल. मराठी भाषेच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसित होईल. पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी अधिक स्पष्ट, अभिरुची संपन्न आणि संस्कारित व जबाबदार नागरिक बनेल, असा विश्वास वाटतो.

## Programme Specific Outcomes (PSOs)

**PSO1.** मराठी भाषा आणि वाड्मयाविषयीचे प्रगत ज्ञान होईल.

**PSO2.** विविध माध्यमांमध्ये भाषा अभ्यास व उपयोजनाच्या संधी विकसित होतील. तसेच समकालीन वाड्मयीन प्रवाहांचे व्यवस्थित आकलन होईल.

**PSO3.** वाड्मयीन व सामाजिक प्रश्नांसंबंधी विचार करण्याची जाण वाढीस लागेल.

**PSO4.** साहित्याच्या लक्षणांबाबत विचारांची आणि वाड्मयीन मूल्यमापनाच्या दृष्टीची समज विकसित होईल.

**PSO5.** साहित्याभ्यासाच्या संदर्भात प्रस्तुत- अप्रस्तुतेची जाण निर्माण करण्यास मदत होईल.

**PSO6.** विद्यार्थ्यांची चिकित्सक अभ्यासाची क्षमता विकसित होईल.

**PSO7.** विशिष्ट कालखंडातील साहित्याच्या अभ्यासाच्या व्याप्ती बद्दल विद्यार्थ्यांची जाण वाढीस लागण्यास मदत होईल.

**PSO8.** साहित्यकृतीच्या, साहित्यप्रकारांच्या, तौलनिक अभ्यासाची दिशा, व्याप्ती व मर्यादा याबाबतीत समज निर्माण होण्यास मदत होईल.

**PSO9.** साहित्याविषयीची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक, भारतीय व पाश्चात्य विचारांबाबत समज वाढविण्यास मदत होईल.

**PSO10.** साहित्याच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांच्या सूक्ष्म, विश्लेषक व चिकित्सक अभ्यास करण्याच्या क्षमतेमध्ये वाढ होईल.

**PSO11.** भाषेचे विविध व्यवहार आणि साहित्याच्या संदर्भातील भाषा व्यवहार याविषयीची आकलनाची क्षमता विकसित होईल.

**PSO12.** विद्यार्थ्यांची भाषिक अभिव्यक्ती सुधारण्यास तसेच पर्यायाने समाजाची भाषिक अभिवृद्धी विकसित होण्याची प्रक्रिया सुरू होईल.

**PSO13.** लेखन- संपादन, लेखन- विद्या, भाषांतर, रूपांतर, अनुवाद, वक्तृत्व कला, नाट्यकला, या अभिव्यक्तीच्या आविष्कार प्रकार व प्रक्रियांविषयी तसेच त्यासंबंधीची माहिती होईल.

**PSO14.** लेखकाच्या समग्र लेखक म्हणून अभ्यासाची जाण विकसित होईल तसेच विविध साहित्य प्रवाहांची माहिती होईल व अशा अभ्यासाच्या आकलनक्षमतेत वाढ होईल.

**PSO15.** समीक्षा आणि उपयोजित समीक्षा याविषयी योग्य समीक्षादृष्टी तयार होण्यास मदत होईल तसेच समीक्षा करण्याची क्षमता विकसित होईल.

**PSO16**. विद्यार्थ्यांची संशोधक वृत्ती व संशोधन करण्याची क्षमता विकसित होईल.

**PSO17.** एक जबाबदार नागरिक या दृष्टीने नैतिक व सामाजिक मूल्ये, साहित्य व सांस्कृतिक मूल्ये, राष्ट्रीय मूल्यांचे संवर्धन पर्यावरण संरक्षणव संवर्धन,समाजभान याविषयीची विद्यार्थ्यांची जाणीव विकसित होईल.

.

**Anekant Education Society's**

## Tuljaram Chaturchand College, Baramati

*(Autonomous)*

## Board of Studies (BOS) in Marathi

**From 2022-23 to 2024-25**

**Anekant Education Society's**

## Tuljaram Chaturchand College, Baramati

*(Autonomous)*

## Board of Studies (BOS) in Marathi

**From 2022-23 to 2024-25**

| Sr. No | Name of Attendees | Designation |
|---|---|---|
| 1 | Prof. Dr . Seema Naik –Gosavi | Chairman |
| 2. | Dr. Mukta Ambhere | Internal Member |
| 3. | Mr. Santoshkumar Daphalapurkar | Internal Member |
| 4. | Dr. Sunil Khamgal | Internal Member |
| 5. | Dr. Rajkuamr Tarade | Internal Member |
| 6. | Prof.Dr. Tukaram Rongate | Vice-Chancellor Nominee |
| 7. | Prof. Dr. Randhir Shinde | Expert from other University |
| 8. | Prof. Dr. Dasoo Vaidya | Expert from other University |
| 10. | Hon. Raj Kazi | Journalist & Author |
| 11. | Hon. Girish Bhandwalkar | Meritorious Alumni |
| 12 | Dr. Ranjana Nemade | BOS Member |
| 15 | Mr. Gaurav Shinde | PG Student |
| 16 | Bibiaysha Landage | PG Student |

**Anekant Education Society's**

## Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce, Baramati (Autonomous)

### Credit Distribution Structure for (M. A. Marathi) Part-I (2023 Pattern)

| Year | Level | Sem. | Major | | Research Methodology (RM) | OJT/ FP | RP | Cum. Cr. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Mandatory** | **Electives** | | | | |
| I | 6.0 | Sem-I | MAR-501-MJM: व्यावहारिक व उपयोजित मराठी –I (**Credit 04**)<br>MAR -502-MJM: मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते इ.स.१६००) (**Credit 04**)<br>MAR 503-MJM: भाषाविज्ञान : वर्णनात्मक (**Credit 04**)<br>MAR -504-MJM: वृत्तपत्र संपादन (**Credit 02**) | MAR -511-MJE: ग्रामीण साहित्य (**Credit 04**) | MAR -521-RM: Research Methodology in Marathi (**Credit 04**) | -- | -- | **22** |
| | | Sem- II | MAR -551-MJM: व्यावहारिक व उपयोजित मराठी –II (**Credit 04**)<br>MAR -552-MJM: मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स.१६०० ते इ.स. १८१८) (**Credit 04**)<br>MAR -553-MJM: भाषाविज्ञान: सामाजिक (**Credit 04**)<br>MAR -554-MJM: कथालेखन निर्मिती व स्वरूप (**Credit 02**) | MAR -561-MJE : दलित साहित्य **Credit 04**) | -- | MAR -581-OJT/FP **Credit 04** | -- | **22** |
| **Cum. Cr.** | | | **28** | **8** | **4** | **4** | **--** | **44** |

**Anekant Education Society's**

# Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce, Baramati (Autonomous)

## Course Structure for (M. A. Marathi ) Part-I (2023 Pattern)

| Sem | Course Type | Course Code | Course Title | Theory/ Practical | No. of Credits |
|---|---|---|---|---|---|
| I | Major (Mandatory) | MAR -501-MJM | व्यावहारिक व उपयोजित मराठी –I | Theory | 04 |
| | Major (Mandatory) | MAR -502-MJM | मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतिहास (प्रारंभ ते इ.स.१६००) | Theory | 04 |
| | Major (Mandatory) | MAR -503-MJM | भाषाविज्ञान: वर्णनात्मक | Theory l | 04 |
| | Major (Mandatory) | MAR -504-MJM | वृत्तपत्र संपादन | Theory | 02 |
| | Major (Elective) | MAR -511-MJE | ग्रामीण साहित्य | Theory | 04 |
| | Research Methodology (RM) | MAR -521-RM | Research Methodology in Marathi | Theory | 04 |
| | | | | **Total Credits Semester I** | **22** |
| | | | | | |
| II | Major (Mandatory) | MAR -551-MJM | व्यावहारिक व उपयोजित मराठी –II | Theory | 04 |
| | Major (Mandatory) | MAR -552-MJM | मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतिहास (इ.स.१६०० ते इ.स.१८१८) | Theory | 04 |
| | Major (Mandatory) | MAR -553-MJM | भाषा विज्ञान: सामाजिक | Theory | 04 |
| | Major (Mandatory) | MAR -554-MJM | कथालेखन निर्मिती व स्वरूप | Theory | 02 |
| | Major (Elective) | MAR 561-MJE | दलित साहित्य | Theory | 04 |
| | On Job Training (OJT)/Field Project (FP) | MAR -581-OJT/FP | On Job Training/Field Project relevant to the major course. | Training/ Project | 04 |
| | | | | **Total Credits Semester II** | **22** |
| | | | | **Cumulative Credits of Semester I and II** | 44 |

## CBCS Syllabus as per NEP 2020 for M.A. I
## (2023 Pattern)

| | | |
|---|---|---|
| **Name of the Programme** | : | **M. A. MARATHI** |
| **Program Code** | : | **PAMAR** |
| **Class** | : | **M. A. I** |
| **Semester** | : | **II** |
| **Course Type** | : | **Major Mandatory (Theory)** |
| **Course Name** | : | व्यावहारिक व उपयोजित मराठी भाग-II |
| **Course Code** | : | **MAR-551-MJM** |
| **No. of Lectures** | : | **60** |
| **No. of Credits** | : | **4** |

### Course Objectives:

1. विद्यार्थ्यांच्या विविध स्तरावरील भाषिक कौशल्ये व क्षमता विकसित करणे.
2. आकाशवाणी, दूरदर्शन माध्यमांसाठी मुलाखत लेखनाची तंत्रे व कौशल्य विकसित करणे.
3. भाषांतर आणि अनुवाद प्रक्रिया यांची तात्विक व व्यावहारिक माहिती देणे.
4. निवेदनकौशल्याची तात्विक व व्यावहारिक माहिती देणे तसेच विविध क्षेत्रातील निवेदकाला असलेल्या संधी अवलोकनार्थ विशद करणे.
5. जनसंपर्क कौशल्याची आवश्यकता समजावणे, माध्यमातील संधी व त्यासाठीची तंत्रे अवगत करणे.
6. रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठीची कौशल्ये विकसित करणे.
7. प्रकाशन संस्था, प्रसारमाध्यमे ,जाहिरात क्षेत्र इ. क्षेत्रातील मुद्रित शोधनाचे नेमके स्थान समजून घेणे.

### Course Outcomes:

CO1. विद्यार्थ्यांना व्यवहारांमध्ये भाषेची विविध उपयोजित कौशल्य आत्मसात करण्याची क्षमता विकसित होईल.

CO2. भाषांतर व अनुवाद कौशल्ये विकसित होतील.

CO3. विविध कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन करता येईल.

CO4. वाड्मयीन व भाषिक जाणीवा विकसित होतील.

CO5. विद्यार्थी रोजगार क्षमता व त्यामध्ये प्राविण्य आत्मसात करेल.

CO6. जनसंपर्क कौशल्ये व तंत्र विकसित होतील.

CO7. विद्यार्थ्यांना प्रकल्प लेखनाची कार्यपद्धती समजेल.

**Topics and learning points**

| घटक | तपशील | तसिका |
|---|---|---|
| १ | **भाषांतर**<br>१ भाषांतराचे स्वरूप, व्याप्ती<br>२ भाषांतराची आवश्यकता व महत्त्व<br>३ भाषांतराचे विविध प्रकार | १० |
| २ | **अनुवादलेखन**<br><br>१ अनुवाद स्वरूप, व्याप्ती<br>२ भाषांतर,व अनुवाद : साम्य-भेद<br>३ अनुवादए भावानुवाद आणि रूपांतर यांतील साम्य—भेद | १० |
| ३ | **निवेदन कौशल्य**<br>१ निवेदनाचे स्वरूप, निवेदनाची आवश्यकता<br>२ निवेदनाची संहिता व तंत्रे—शैली<br>३ विविध कार्यक्रमांचे आयोजन—नियोजन—संयोजन | १० |
| ४ | **माध्यमनिहाय सूत्रसंचालन**<br>१ कार्यक्रमनिहाय सूत्रसंचालन (आकाशवाणी, दूरदर्शन)<br>२ सांस्कृतिक कार्यक्रम, जाहीर कार्यक्रम इ.<br>३ प्रभावी निवेदनाची गुणवैशिष्ट्ये | |
| ५ | **जनसंपर्क कौशल्य**<br>१ जनसंपर्काचे स्वरूप व आवश्यकता<br>२ जनसंपर्क कौशल्याची तंत्रे, जनसंपर्क कौशल्याची भाषा<br>३ माहिती व जनसंपर्क अधिकारी (शासन, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, बॅंका, कंपन्या– जनसंपर्काचे महत्त्व व आवश्यकता | १० |
| ६ | **प्रकल्पलेखन**<br>१ प्रसारमाध्यमांचे कार्यालय, प्रकाशन संस्था,<br>२ आकाशवाणी –शैक्षणिक सहल वृत्तांतलेखन, प्रकल्प लेखन<br>३ कार्यालयीन कामकाज – कार्यप्रणाली`, प्रकल्पलेखन | १० |

**संदर्भग्रंथ–**


१. अनुवाद : स्वरूप और विवेचन य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
२. साहित्य संवाद –प्रा.वि.शं. चौघुले, प्रतिमा प्रकाशन, पुणे
३. संवादशास्त्र श्रीपाद जोशी, संभव प्रकाशन नागपूर

४. व्यक्तिमत्व विकास–य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
५. भाषा : अंत:सूत्र आणि व्यवहार – संपा. मु.ग. पानसे
६. भाषांतर विद्या: स्वरूप आणि समस्या –डॉ. रमेश वरखेडे
७. भाषा: मातृभाषा आणि परभाषा – रा.सो. सराफ
८. चिंतन आणि चर्चा– श्री.ना. बनहट्टी
९. शासन व्यवहारात मराठी भाषा– संचालनालय महाराष्ट्र शासन
१०. महाराष्ट्र साहित्य परिषद –म.श्री. दीक्षित, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
११. साहित्याची भाषा –डॉ. भालचंद्र नेमाडे
१२. साहित्य संमेलनाचे महाभारत –डॉ. भीमराव कुलकर्णी, सुपर्ण प्रकाशन, पुणे
१३. सामाजिक संशोधन पध्दती–डॉ. पु.ल. भांडारकर, विद्या बुक्स, औरंगाबाद
१४. सुगम मराठी व्याकरण लेखन–मो.रा. वाळंबे, नितीन प्रकाशन पुणे
१५. मराठी नियतकालिकांचा वाड्मयीन अभ्यास डॉ. उषा मा. देशमुख, खंड १ ते ३ पुणे
१६. मराठी लेखनकोश–अरूण फडके ढवळे प्रकाशन, मुबंई
१७. भाषांतर चिकित्सा –डॉ. मधुकर मोकाशी
१८. व्यासपीठ –डॉ. महादेव वाळुंज
१९. टेलिव्हीझन आणि प्रसार माध्यमे डॉ. केशव साठये, प्रतिक प्रकाशन, पुणे
२०. वाचिक अभिनय – श्रीराम लागू, राजहंस प्रकाशन, पुणे.
२१. व्यावहारिक मराठी विशेषांक – नवभारत, १९८१.
२२. सृजनात्मक लेखन – डॉ. आनंद पाटील, पदमगंधा प्रकाशन, पुणे.

Choice Based Credit System Syllabus (2023Pattern)
(As Per NEP 2023)

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: MA (Sem II) **Subject**: MARATHI
**Course**: Theory **Course Code**: **MAR-551-MJM**
**Title of Course :** व्यावहारिक आणि उपयोजित मराठी भाग – २

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | **Programme Outcomes (POs)** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 |
| CO 1 | 3 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 |
| CO 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 3 | 3 | 3 | 2 | 2 | 1 | 1 | 2 | 2 |
| CO 4 | 3 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 5 | 2 | 2 | 1 | 3 | 1 | 2 | 1 | 2 |
| CO 6 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 2 | 3 |
| CO 7 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 8 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |

## Justification for the mapping

**PO1: Research Related Skill**

CO1: भाषेच्या ज्ञानामुळे विद्यार्थ्यांना करीयरच्या विविध वाटा सुलभ होतील विविध व्यावसायिक क्षेत्रात भाषा कौशल्यामुळे संशोधनास वाव मिळेल.

**PO2: Effective Citizenship and Ethics**

CO3: साहित्याच्या अभ्यासाने जीवन जगण्यासाठी विविध प्रकारची कौशल्ये अवगत करून भाषा साहित्य व विविध कलांच्या माध्यमातून विद्यार्थी एक सुसंकृत व भाषासंपन्न बनेल.

**PO3: Social Competence and communication skills:**

CO4: भाषांतरकार अनुवादक जनसंपर्क अधिकारी, वार्ताहर, निवेदक, सूत्रसंचालक प्रकाशक, पटकथा, लेखक, संपादक अशा भाषा व साहित्याशी सबंधित असंख्य संधी निर्माण होतील. या सर्व क्षेत्रात भाषा संवादक म्हणून विद्यार्थी भूमिका बजावेल.

**PO4: Disciplinary Knowledge**

CO5: मराठी भाषेचे उपयोजन,व्यवसायिक व माहितीपर लेखन या संबंधीचा अभ्यासाचा पाया पक्का होईल. व विद्यार्थी लेखन करू लागेल.

**PO5: Personal and professional competence:**

CO2: विविध साहित्य संस्थानचे वाङ्मयीन कार्य यांची ओळख होऊन व्यवसायाचे आत्मभान येईल.

**PO6: Self- directed and life –long learning**

CO6 : भाषा अभ्यासाची नानाविध तंत्रे विद्यार्थी आत्मसात कार्ल.व जीवनाकडे पाहण्याची दृष्टी विकसित होईल.

**PO7: Environment and Sustainability:**

CO7: भाषेच्या व्यावहारिक ज्ञानामुळे वाङ्मयीन सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक, पर्यावरणाचा एक स्वतंत्र अभिरुची विकसित होण्यास मदत होईल. त्यातून पर्यावरण विषयक सजग जाणीव वाढीस लागेल.

**PO8: Critical Thinking and Problem solving:**

CO6 : भाषेच्या व्यावहारिक उपयोजनातून चिकित्सक व समस्या सोडवण्याची वृत्ती विद्यार्थी अवगत करेल.

***************************

**Anekant Education Society's**
**Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce, Baramati**
**(Autonomous)**

# Course Structure For M.A. I MARATHI SYLLABUS
## From-JUNE-2023

| Semester | Paper Code | Title of Paper | No. of Credits |
|---|---|---|---|
| II | MAR-552-MJM | मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ( इ.स. १६०० ते १८१८) | 4 |

# CBCS Syllabus as per NEP 2020 for M.A. I
# (2023 Pattern)

Name of the Programme : M.A. (MARATHI)
Programme Code : PAMAR
Class : M. A. I (Marathi)
Semester : II
Course Type : Major
Course Name : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ. स. १६०० ते १८१८)
Course Code : **MAR-552-MJM**
No. of lectures : 60
No. of Credit : 04

## Course Objectives:

१) मराठी संतकाव्य, पंतकाव्य आणि शाहिरी काव्याचा अभ्यास करणे.
२) मध्ययुगीन साहित्यामधील विविध वाङ्मयीन प्रवाहांचे स्वरूप यांचा आढावा घेणे.
३) मध्ययुगीन काळातील गद्य आणि पद्य परंपरेचा अभ्यास करणे.
४) मराठी भाषेच्या विकासाचा व बदलाचा अभ्यास करणे.
५) तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
६) मध्ययुगीन काळातील गद्य आणि पद्य वाङ्मयाचे आकलन व आस्वाद घेणे.
७) वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदायातील वेगळेपणाचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

## Course Outcome:

CO.1 मध्ययुगीन काळातील मराठी साहित्याचे स्वरूप लक्षात येईल.
CO.2 विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या विकासाचे व बदलाचे आकलन होईल.
CO.3 संत, पंत आणि शाहीरी काव्याचे स्वरूप आणि वेगळेपण लक्षात येईल.
CO.4 संत, पंत आणि तंत यांचे साहित्यिक योगदान कळून येईल.
CO.5 संत, पंत आणि तंत यांच्या सामाजिक जाणिवेचे स्वरूप समजून घेता येईल.
CO.6 बखरींचे सामाजिक व ऐतिहासिक महत्त्व व वाङ्मयीन स्वरूप लक्षात येईल.
CO.7 तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीची जाणीव होईल.
CO.8 मध्ययुगीन काळातील संत पंत आणि शाहीरी काव्याची चळवळ यातील सहसंबंध लक्षात घेता येतील.

## Topic and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | अ) **कालखंडाची पार्श्वभूमी**<br>मराठी वाङ्मयाच्या प्रस्तुत कालखंडाची शैक्षणिक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, पार्श्वभूमी, वाड्मयीन परंपरा, प्रेरणा, प्रवृत्ती<br>**ब) संत तुकाराम, यांची काव्यनिर्मिती**<br>१.१ संत तुकाराम यांच्या काव्यनिर्मितीची प्रेरणा<br>१.२ संत तुकारामांच्या अभंगनिर्मितीचे स्वरूप<br>१.३ संत तुकारामांच्या अभंगनिर्मितीची वैशिष्ट्ये | १० |
| २ | **संत रामदास यांची काव्यनिर्मिती**<br>२.१ समर्थ संप्रदाय<br>२.२ संत रामदास यांच्या काव्यनिर्मितीची प्रेरणा<br>२.३ संत रामदास यांच्या काव्यनिर्मितीचे स्वरूप<br>२.४ संत रामदासांच्या काव्यनिर्मितीची वैशिष्ट्ये | १० |
| ३ | **पंडिती काव्य संकल्पना व स्वरूप**<br>३.१ पंडिती काव्य - संकल्पना<br>३.२ पंडिती काव्याची प्रेरणा<br>३.३ पंडिती काव्याचे स्वरूप | १० |
| ४ | **पंडिती काव्य**<br>४.१ मध्ययुगीन काळातील प्रमुख पंडित कवी<br>४.२ पंडिती काव्याचे वाड्मयीन सौंदर्य<br>४.३ पंडिती काव्याची वैशिष्ट्ये व वेगळेपण | १० |
| ५ | **बखर वाड्मय**<br>५.१ बखर वाड्मय संकल्पना<br>५.२ बखर वाड्मय व्युत्पत्ती व स्वरूप<br>५.३ प्रमुख बखरकार व बखरी<br>५.४ बखरींचे वाड्मयीन व ऐतिहासिक महत्त्व | १० |
| ६ | **शाहिरी वाड्मय**<br>६.१ शाहिरी वाड्मय संकल्पना<br>६.२ शाहिरी वाड्मय - व्युत्पत्ती व स्वरूप<br>६.३ शाहिरी वाड्मयाचे प्रकार<br>६.४ प्रमुख शाहीर व त्यांचे साहित्य | १० |

**संदर्भ ग्रंथ –**


१) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – डॉ. ल. रा. नासिराबादकर

२) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ ते ७ डॉ. अ. ना.देशपांडे

३) प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप – डॉ. ह.श्री.शेणोलीकर

४) पाच संतकवी – डॉ. शं. गो. तुळपुळे

५) संत, पंत, तंत – श्री. म. माटे

६) प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा – श्री. रं. कुलकर्णी

७) मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास – डॉ. प्र. न. जोशी

८) मराठी वाङ्मयाचा इतिहास – 1,2,3 प्रकाशक, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे

९) वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य – डॉ. शिवाजीराव मोहिते

१०) बखर वाङ्मय उद्गम व विकास – बापुजी संकपाळ

११) काही संत काही शाहीर – डॉ. मू. श्री. कानडे

१२) प्राचीन मराठी पंडिती काव्य – डॉ. के. ना. वाटवे

१३**)** संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती- डॉ**.**गं**.**बा**.** सरदार


**********************

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)

(As Per NEP 2023)

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: M.A. I (Sem II) **Subject**: MARATHI

**Course**: Theory **Course Code**: **MAR-552-MJM**

**Title of Course :** मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतिहास (इ.स. 1600 ते 1818)

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | Programme Outcomes (POs) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 |
| CO 1 | 2 | 2 | 2 | 3 | 2 | 1 | 2 | 2 |
| CO 2 | **2** | 3 | 1 | 2 | 1 | 2 | 2 | 3 |
| CO 3 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 2 | 2 |
| CO 4 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 |
| CO 5 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 |
| CO 6 | 3 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 3 | 2 |
| CO 7 | 3 | 2 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 1 |
| CO 8 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 1 |

## Justification for the mapping

**PO1: Research Related Skill :**

CO6 : प्राचीन ग्रंथांच्या आधारे भाषेच्या संशोधनास चालना मिळेल. मराठी भाषेचा इतिहास कळेल तसेच तत्कालीन मराठी वाड्मयाच्या निर्मितीचा अभ्यास करता येईल. मराठी भाषेचा ऐतिहासिक व वाड्मयीन दृष्टिकोनातून शोध घेता येईल. त्यामुळे मराठी भाषेच्या संशोधनास चालना मिळेल.

**PO2: Effective Citizenship and Ethics**

CO2 : साहित्य परंपरा व प्रवृत्तीचा अभ्यास होईल. वाड्मयाच्या निर्मिती काळाचा व परिस्थितीचा अभ्यास करता येईल. तसेच साहित्य निर्मितीच्या काळातील समाजजीवनाचा, त्यातील नीतिमूल्यांचा व जीवनमूल्यांचा अभ्यास करता येईल.

**PO3: Social Competence and communication skills:**

CO4 : मराठी वाड्मयाची ऐतिहासिक सामाजिक धार्मिक आणि राजकीय पार्श्वभूमी लक्षात येईल. तसेच त्याकाळातील समाजाचा साहित्यावर पडलेला प्रभाव शोधता येईल. त्याचा उपयोग मध्ययुगीन काळातील समाज व साहित्य यांचे आकलन होईल. त्याचा परिणाम समाजाचा अभ्यास करताना होईल.

**PO4: Disciplinary Knowledge**

CO1 : भाषेचे इतिहासातील स्थान व महत्त्व लक्षात येईल. त्यामुळे भाषेच्या व साहित्याच्या समृद्धीसाठी एक नवीन दृष्टीकोन निर्माण होईल. प्रत्येक कालखंडात भाषा कशी बदलेत गेली. तसेच तिच्यावर कोणते संस्कार झाले? बखर गद्य, पंडिती काव्य आणि शाहीरी काव्य यातील वेगळेपण लक्षात येईल.

**PO5: Personal and professional competence :**

CO7 : मराठी भाषेवर इतर भाषांचा प्रभाव लक्षात येईल. तसेच प्राचीन भाषेच्या माध्यमातून चालणाऱ्या वैयक्तिक व व्यावसायिक संधीचा शोध घेता येईल. प्राचीन भाषेचा व्यवसायाच्या अनुषंगाने काय उपयोग करता येईल. याचा शोध घेता येईल.

**PO6 :Self- directed and life –long learning**

CO3 : बखरींचे ऐतिहासिक व वाङ्म्यीन महत्त्व लक्षात येईल. त्यामुळे ऐतिहासिक शब्दांचा, भाषेचा, वाकप्रतिमांचा शोध घेता येईल. त्याचा विचार भाषेच्या जतन व संवर्धनासाठी करता येईल.

**PO7 : Environment and Sustainability:**

CO6 : महाराष्ट्रातील विविध संप्रदायाची ओळख होईल. अनेक सतांच्या अभंगामध्ये, पंडिती काव्यात व शाहीरी काव्यात पर्यावरण विषयी विचार आले आहेत. त्याचा अभ्यास करता येईल. समाजात पर्यावरण व शाश्वत विकास याबद्दल विचार पोहचवता येतील.

**PO8 : Critical Thinking and Problem solving:**

CO2 : संत, पंत व तंत साहित्याची ओळख होईल. त्यात आलेल्या तत्कालीन समजवास्तवाचे दर्शन घडेल. त्यामुळे समाजात असलेल्या अनिष्ट रूढी-परंपरा, चालीरीती याविरुद्ध आवाज उठवता येईल. तसेच अध्यात्माच्या मधमातून समाजामध्ये जागृती करता येईल.

******************

## CBCS Syllabus as per NEP 2020 for M.A. I
## (2023 Pattern)

| | | |
|---|---|---|
| **Name of the Programme** | : | **M.A. MARATHI** |
| **Program Code** | : | **PAMAR** |
| **Class** | : | **M. A. I** |
| **Semester** | : | **II** |
| **Course Type** | : | **Major Mandatory (Theory)** |
| **Course Name** | : | **भाषाविज्ञान : सामाजिक** |
| **Course Code** | : | **MAR-553-MJM** |
| **No. of Lectures** | : | **60** |
| **No. of Credits** | : | **4** |

## Course Objectives:

१) विदयार्थ्यांना मराठी भाषेचे प्रगत ज्ञान करुन देणे..
२) भाषेच्या अभ्यासाच्या विविध पद्धतीचा परिचय करून देणे त्यांचे महत्व जाणवून देणे.
३) भाषेचा इतर सामाजिक क्षेत्राशी असलेला संबंध लक्षात घेऊन त्यानुसार त्याचा वापर करणे.
४) भाषेचा समाज वैज्ञानिक दृष्टीने अभ्यस करणे..
५) विद्यार्थ्यांना भाषेच्या अभ्यासाच्या अंगाचा परिचय करून देणे.
६) भाषेचा लिंग भेदानुसारी वापर करणे.
७) बहुभाषिकतेच्या दृष्टीने भाषा हे शिक्षणाचे माध्यम कसे? समजावून घेणे.

## Course Outcomes:

CO1- समाज रचनेनुसार भाषेतील विविध स्तर विद्यार्थ्यांच्या लक्षात येतील.
CO2- मराठी भाषेबद्दल विद्यार्थ्यांची आवड निर्माण होईल.
C03-मराठी भाषेचा इतर क्षेत्राशी असलेला सबंध लक्षात येईल.
C04- प्रमाण भाषा आणि परभाषा यातील परस्पर संबंध समजेल.
CO5- भाषा, समाज व बोली यांचा परस्पर संबंध लक्षात येईल
CO6- सामाजिक भाषाविज्ञानाच्या विविध शाखांचा परिचय होईल.
CO7- मराठीच्या संदर्भात तंत्रज्ञानासंबंधी शब्द निर्मिती करता येईल.

## Topics and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **सामाजिक भाषाविज्ञान परिचय**<br>१) सामाजिक भाषाविज्ञान स्वरूप व व्याप्ती<br>२) भाषा व समाज यांचा परस्पर संबंध | १० |
| २ | **भाषा आणि इतर क्षेत्रे**<br>१) भाषा आणि आर्थिक वर्ग व्यवस्था<br>२) भाषा आणि विविध व्यावसायिक क्षेत्रे<br>३) भाषा आणि विविध क्षेत्रीय वापर<br>४) भाषा आणि व्यावसायिक शिक्षण | १० |
| ३ | **भाषेचा लिंग भेदानुसारी वापर**<br>स्त्रियांची भाषा<br>पुरुषांची भाषा | १० |
| ४ | **भाषा आणि व्यवस्था**<br>१) भाषा आणि सांस्कृतिक व्यवस्था<br>२) भाषा आणि सामाजिक व्यवस्था | १० |
| ५ | **प्रमाण भाषा आणि परभाषा संपर्क**<br>१) पिजिनची निर्मिती ऱ्हास, ऱ्हासाची कारणे<br>२) क्रिओल निर्मिती, स्थिरता, मराठी क्रिओल भाषा. | १० |
| ६ | **भाषा शिक्षणाचे माध्यम**,<br>१) बहुभाषिक समाजात भाषा शिक्षणाचे माध्यम,<br>२) मराठीच्या संदर्भात तंत्रज्ञानासंबंधी शब्द निर्मिती. | १० |

**संदर्भ ग्रंथ -**


१. समाजभाषाविज्ञान: प्रमुख संकल्पना- डॉ. वरखेडे रमेश
२. सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली- डॉ. शशिकला कावळे
३. सामाजिक भाषाविज्ञान संपा. डॉ. जयश्री पाटणकर
४. सामाजिक भाषाविज्ञान: एक नवे अभ्यासक्षेत्र मराठी संशोधन पत्रिका
५. मध्यमा डॉ. अशोक केळकर
६. आधुनिक भाषाविज्ञान संरचनावादी व सामान्य- डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण
७. भाषा आणि भाषाशास्त्र- डॉ. श्री. न. गजेंद्रगडकर
८. मराठीचा भाषिक अभ्यास: संपा.मु. श्री. कानडे
९. भाषाविज्ञान वर्णनात्मक आणि ऐतिहासिक- संपा: डॉ.मालशे डॉ. इनामदार डॉ. सोमण
१०. अभिनव भाषाविज्ञान- डॉ. गं.ना जोगळेकर
११. भाषाविज्ञान परीचय-डॉ. मालशे डॉ. पुंडे डॉ. सोमण
१२. आधुनिक भाषाविज्ञान: सिद्धांत आणि उपयोजन-डॉ. मिलिंद मालशे
१३. सुबोध भाषाशास्त्र- प्र. न. जोशी
१४. सुलभ भाषाविज्ञान-डॉ. दत्तात्रेय पुंडे
१५. भाषा इतिहास आणि भूगोल- डॉ. ना. गो. कालेलकर


************************

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)
(As Per NEP 2023)
**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: M.A. I (Sem II)
**Course**: Theory
**Subject**: MARATHI
**Course Code**: **MAR-553-MJM**
**Title of Course : भाषाविज्ञान : सामाजिक**

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | **Programme Outcomes (POs)** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 |
| CO 1 | 3 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 |
| CO 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 3 | 3 | 3 | 2 | 2 | 1 | 1 | 2 | 2 |
| CO 4 | 3 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 3 | 2 |
| CO 5 | 2 | 2 | 1 | 3 | 2 | 2 | 1 | 2 |
| CO 6 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 2 | 3 |
| CO 7 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 8 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |

## Justification for the mapping

**PO1: Research Related Skill**
Co1..समाज भाषा विज्ञान हे भाषा अभ्यासाचे एक व्यापक क्षेत्र असल्याचे विद्यार्थ्यांना समजेल.
**PO2: Effective Citizenship and Ethics**
Co2...भाषा विज्ञानाच्या विस्तारित कक्षांचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.
**PO3: Social Competence and communication skills:**
Co6,..समाजभाषा विज्ञानातील विविध नाविन्यपूर्ण कक्षांचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास विकसित होईल.
**PO4: Disciplinary Knowledge**
Co7, भाषेचा पारंपारिक अभ्यास समाजभाषा विज्ञानाच्या साहाय्याने समजून घेता येईल.
**PO5: Personal and professional competence:**
Co5..बोली भाषेचे स्वरूप व वैशिष्ट्ये पाहून सामाजिक दृष्टीने परस्पर संबंधांचा अभ्यास करता येईल.
**PO6: Self- directed and life –long learning**
Co4..प्रमाण मराठी भाषा व इतर भाषा यांचे स्वरूप समजेल.
**PO8: Critical Thinking and Problem solving:**
Co3,...समाजभाषा विज्ञानाचे स्वरूप समजेल. भाषेतील विविध लघु क्षेत्रांचा संशोधनच्यादृष्टीने विद्यार्थ्यांना अभ्यास करता येईल.

*************

## CBCS Syllabus as per NEP 2020 for M.A. I
## (2023 Pattern)

**Name of the Programme** : M.A. MARATHI
**Program Code** : PAMAR
**Class** : M.A. I
**Semester** : II
**Course Type** : Major Mandatory (Theory)
**Course Name** : कथालेखन निर्मिती व स्वरूप
**Course Code** : MAR-554- MJM
**No. of Lectures** : 30
**No. of Credits** : 02

## Course Objectives:

१. साहित्यप्रकाराची संकल्पना व स्वरूप अभ्यासणे.
२. मराठी कथेची जडणघडण अभ्यासणे.
३. वाङ्मयीन अभिव्यक्तीसाठी भाषेचा सर्जनशील वापर करणे.
४. स्वतःमधील भाषिक सर्जनशीलता वाढविता येईल.
५. कथाबीजाच्या आधारे कथा लेखन करण्यास प्रवृत्त करणे.,
६. भाषेचे सौंदर्य वाढविणाऱ्या अलंकारांचे प्रत्यक्ष उपयोजन करणे.
७. साहित्यभाषेतील सौंदर्यासंबंधीची आस्था वाढून साहित्यनिर्मितीचा आनंद शोधणे .

## Course Outcomes:

CO1. वाङ्मयीन अभिव्यक्तीसाठी भाषेचा सर्जनशील वापर होईल.
CO2. कथात्म साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना यांचा परिचय होईल.
CO3. कथेच्या घटकांचे महत्त्व समजेल. कथेची निर्मिती प्रक्रिया अभ्यासता येईल.
CO4. कथा या साहित्य प्रकाराची जडणघडण समजेल.
CO5. लेखकाचे व्यक्तिमत्त्व व कथाबीज यांचा परस्पर संबंध लक्षात येईल.
CO6. कथा संहिता लेखन करता येईल.
CO7. विद्यार्थी वास्तव जीवनानुभव व सर्जनशीलतेतून साहित्यनिर्मितीचा आनंद घेईल .

## Topics and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **कथा संकल्पना व स्वरूप**<br>• कथा साहित्य प्रकाराचे स्वरूप व आकृतिबंध<br>• कथेचे –घटक कथेची अंत:सूत्रे, कथेचे तंत्र,<br>• कथा आरंभ -मध्य- शेवट, कथेचा उत्कर्षबिंदू<br>• कथेचे प्रकार / वर्गीकरण | १० |
| २ | **कथा निर्मिती प्रक्रिया**<br>• कथा निर्मितीची प्रेरणा<br>• कथा कशी सुचते?<br>• लेखकाचे व्यक्तिमत्त्व व कथाबीज<br>• कथेचे सहिता लेखन | १० |
| ३ | **निवडक कथा साहित्यकृती**<br>• स्मशानातील सोनं – अण्णभाऊ साठे<br>• झोप –द. मा. मिरासदार<br>• लग्न संपल्यावर – प्रिया तेंडूलकर<br>• झेल्या – व्यंकटेश माडगूळकर | १० |

**संदर्भग्रंथ-**

१. निवडक मराठी कथा - संपादक डॉ. वसंत शेकडे, डॉ.गीता मांजरेकर आणि इतर, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर जि . .अहमदनगर.
२. मराठी कथा उगम आणि विकास - डॉ. इंदुमती शेवडे, सोमय्या प्रकाशन.मुंबई
३. कथा संकल्पना आणि समीक्षा - डॉ. सुधा जोशी, मौज प्रकाशन, मुंबई
४. मराठी कथा:उगम आणि विकास – डॉ.इंदुमती शेवडे ,सोमय्या प्रकाशन ,मुंबई
५. मराठी कथेची स्थितिगती – डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
६. लघुकथालेखन मंत्र आणि तंत्र – ना. सी. फडके, प्रतिमा प्रकाशन, पुणे
७. कथा संकल्पना आणि समीक्षा- सुधा जोशी, मौज प्रकाशन, मुंबई
८. साहित्याची निर्मिती प्रक्रिया- आनंद यादव मेहता पब्लिशिंग, पुणे
९. स्मशानातील सोनं – अण्णभाऊ साठे
१०. झोप –द. मा. मिरासदार
११. लग्न संपल्यावर – प्रिया तेंडूलकर
१२. झेल्या –व्यंकटेश माडगूळकर
१३. मराठीतील कथनरूपे- डॉ. वसंत आबाजी डहाके

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)

(As Per NEP 2020)

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: M.A. I (Sem II) **Subject**: MARATHI

**Course**: Theory **Course Code**: MAR-554- MJM

**Title of Paper** - कथालेखन निर्मिती व स्वरूप

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | Programme Outcomes (POs) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 |
| CO 1 | 3 | 2 | 2 | 2 | 1 | 3 | 2 | 2 |
| CO 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 3 | 3 | 3 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 |
| CO 4 | 3 | 2 | 3 | 3 | 2 | 2 | 3 | 2 |
| CO 5 | 2 | 2 | 1 | 3 | 2 | 2 | 1 | 2 |
| CO 6 | 3 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 2 | 3 |
| CO 7 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 8 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 1 |

## Justification for the mapping

**PO1: Research-Related Skills:**

CO1 : विद्यार्थ्यांमध्ये कथा या साहित्यप्रकाराचा सूक्ष्म पातळीवर अभ्यास करण्याची संशोधनात्मक क्षमता विकसित होईल.

**PO2: Effective Citizenship and Ethics:**

CO3 : कथा निर्मिती प्रक्रिया समजल्यामुळे विविध समाजातील सामाजिक विषयांवर कथा निर्मिती करण्यास सक्षम झाल्यामूळे सामाजिक असमतोलावरती कथा निर्मिती होईल..

**PO3 : Social competence and communication skills:**

CO5 : वाङ्मयीन अभिव्यक्तीसाठी भाषेचा सर्जनशील वापर करण्याची क्षमता विकसित होईल.

**PO4: Disciplinary Knowledge:**

CO7 : कथा संहिता लेखन करण्यासाठी सृजनात्मक शिस्तीची आवश्यकता अंगी बानण्यास मदत होईल.

**PO5: Personal and professional competence:**

CO3 : लेखकाचे व्यक्तिमत्त्व व कथाबीज यांचा परस्पर संबंध लक्षात आल्यामुळे विविध विषयावरील कथालेखन करण्यास सक्षम होतील.

**PO6: Self-directed and Life-long learning:**

CO6 : कथात्मक साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना यांचा परिचय झाल्यामुळे ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्याच्या परिप्रेक्षात कथानिर्मिती प्रक्रियेची उकल होईल.

**PO7 : Environment and Sustainability:**

CO1 : प्रादेशिक दृष्टिकोनातून कथेमध्ये येणारी बोलीभाषा तिचे भाषिक सौंदर्य याची उकल झाल्यामुळे नवकथाकार विविध प्रदेशातील निसर्गसौंदर्य, बोलीभाषा यांचा आविष्कार करण्यास सक्षम होतील.

*************************

## CBCS Syllabus as per NEP 2020 for M.A. I (2023 Pattern)

Name of the Programme : M.A Marathi
Programme Code- : PAMAR
Class : M.A.I (MARATHI)
Semester : II
Course Type : Electives
Course Name : दलित साहित्य
Course Code : MAR-561-MJE
No. of Lecturer : 60
No. of Credit : 04

**Course Objectives:**

१) स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या कालखंडातील दलित साहित्य निर्मितीची पार्श्वभूमी समजावून घेणे.
२) साठोत्तरी मराठी साहित्यामधील विविध वाङ्मयीन प्रवाहांचे स्वरूप आणि कार्य यांचा आढावा घेणे.
३) दलित साहित्याचे स्वरूप व कार्य समजावून घेणे.
४) दलित साहित्यातील विविध वाङ्मय प्रकाराचा विकास कसा होत गेला याचा अभ्यास करणे.
५) साहित्यातून व्यक्त होणाऱ्या वेदना व विद्रोह याचे स्वरूप समजावून घेणे.
६) दलित साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध यांचा अभ्यास करणे.
७) दलित साहित्याच्या सामाजिक बांधिलकीचा अभ्यास करणे.

## Course Outcome:

**CO1**. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या कालखंडातील दलित साहित्य निर्मितीची पार्श्वभूमी लक्षात येईल.
**CO2.** दलित साहित्यातील विविध वाङ्मय प्रकाराचा अभ्यास होईल.
**CO3.** साठोत्तरी मराठी साहित्यामधील विविध वाङ्मयीन प्रवाहांचे बदलते स्वरूप आणि कार्य लक्षात येईल.
**CO4.** दलित साहित्य आणि सामाजिक बांधिलकीचा यांचा परस्पर संबंध समजवून येईल.
**CO5.** दलित बोलीचा अभ्यास होईल.
**CO6.** दलित साहित्याच्या अभ्यासामुळे सामाजिक प्रश्नांची जाणीव होईल.
**CO7.** दलित साहित्याच्या अभ्यासामुळे भाषेच्या परिप्रेक्ष्यात व्यक्त करण्यास सक्षम होतील.

## Topics and learning points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **साठोत्तरी मराठी साहित्य स्वरूप आणि दलित साहित्य**<br>१.१ साठोत्तरी मराठी वाङ्य.मयीन प्रवाह<br>१.२ दलित साहित्य स्वरूप आणि संकल्पना | १० |
| २ | **दलित साहित्य प्रवाह : प्रेरणा आणि प्रवृत्ती**<br>२.१ दलित व दलित साहित्य : संज्ञा स्पष्टीकरण<br>१.४ दलित साहित्य: प्रेरणा आणि प्रवृत्ती<br>२.४ दलित साहित्याचे देशीपण व वेगळेपण | १० |
| ३ | **दलित साहित्य आणि समाज : सहसंबंध**<br>२.१ भारतीय समाज: जात वास्तव<br>२.२ भारतीय समाज : दलितांचे स्थान, आर्थिक-सामाजिक स्थितीगती<br>२.३ दलित समाज: सामजिक आणि सांस्कृतिक अनुबंध<br>२.४ दलित समाज: स्थितंतरे आणि दलित साहित्य | १० |
| ४ | दलित साहित्याची वाटचाल<br>४.१ दलित कविता-शाहिरी<br>४.२ दलित कथा<br>४.३ दलित कादंबरी<br>४.४ दलित नाटक<br>४.५ दलित आत्मकथन | १० |
| ५ | दलित साहित्य: स्वरूप चिकित्सा<br>५.१ दलित साहित्याचे भाषिक आविष्काररूपे<br>५.२ दलित साहित्य चळवळ आणि दलित साहित्य | १० |
| ६ | **दलित साहित्य आणि बांधिलकी**<br>६.१ दलित साहित्याची सामाजिक बांधिलकी<br>६.२ दलित साहित्याचे बदलते विषय | १० |

**संदर्भ ग्रंथ-**

१) दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह- डॉ. भालचंद्र फडके
२) दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप – यशवंत मनोहर
3) दलित साहित्यातील स्पदाने : गो. म. कुलकर्णी
४) दलित साहित्य : एक चिंतन –अर्जुन डांगळे
५) दलित साहित्य : एक क्रांती विज्ञान-बाबुराव बागूल
६) दलित साहित्य : वामन निंबाळकर

७) दलित साहित्य : स्वाद आणि शोध - यशवंत मनोहर
८) दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर - दत्ता भगत
९) दलित साहित्य : विचार आणि वैभव – डॉ. अनिल गजभिये
१०)दलित नाटक,प्रेरणा आणि विकास : डॉ. शैलेश त्रिभुवन
११) दलित साहित्याचे निराळेपण : डॉ. प्रभाकर मांडे
१२) दलित आत्मकथने : डॉ. वासुदेव मुलाटे
१३)मार्क्सवाद आणि दलित साहित्य -वि.स.जोग,
१४)निळी पहाट- रा.ग.जाधव
१५) आंबेडकरी विचार आणि दलित साहित्य -डॉ.अविनाश डोळस
१६) दलित आत्मकथने- डॉ.गंगाधर पानतावणे
१७) दलित साहित्य- दिशा आणि दिशांतर -दत्ता भगत

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)

(As Per NEP 2020)

## Mapping of Program Outcomes with Course Outcomes

**Class**: M.A. I (Sem II)
**Course**: Theory

**Subject**: MARATHI
**Course Code**: MAR-561 MJE
**Title of Course :** दलित साहित्य

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | Programme Outcomes (POs) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 |
| CO 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 |
| CO 3 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 4 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 |
| CO 5 | 3 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| CO 6 | 3 | 2 | 3 | 2 | 1 | 2 | 2 | 1 |
| CO 7 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 2 | 2 | 1 |

## Justification for the mapping

**PO1: Research Related Skill**
CO5: दलित साहित्याच्या अभ्यासामुळे मराठी भाषेच्या विविध बोलींचा अभ्यास करून बोलीच्या संवर्धनासाठी विद्यार्थी सक्षम होईल. दलित समजाच्या विविध प्रादेशिक बोलीच्या माध्यमातून त्यत-त्या प्रदेशातील विविध आचार-विचार समजावून घेऊन ते साहित्याच्या माध्यमातून समृद्ध करण्यासाठीचे संशोधनात्मक कौशल्ये विकसित होईल.
**PO2: Effective Citizenship and Ethics**
CO4 : दलित साहित्यमध्ये उच्च नैतिक मूल्येसकारात्मकपणे व्यक्त केले असल्यमुळे दलितांना समानतेचा हक्क मिळविण्यासाठी साहित्याच्या माध्यमातून सकारात्मक आणि नैतिकतेचा बोध होईल.
**PO3: Social Competence and communication skills:**
CO6: दलित साहित्याच्या माध्यमातून समाजातील असमानता स्पृश्य-अस्पृश्य ,जातीय भेद यांची जाणीव विद्यार्थ्यांना झाल्यामुळे सामाजिक जागृती होऊन ते बदलण्यास तयार होईल.
CO7: भाषेच्या माध्यमातून आपली अनुभूती आणि भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.
**PO4: Disciplinary Knowledge**
CO1 : स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित साहित्याची निर्मिती आणि त्याची पार्श्वभूमी समजून येईल. त्याची निर्मितीच्या विविध कारणांचा शोध घेता येईल.
CO3: साठोत्तरी मराठी साहित्यातील दलित साहित्याच्या वाङ्मयीन प्रवाहामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक परिप्रेक्ष्यासह अनेक अनुभव चित्रित झाले आहे. त्याचे एकमेकांशी संबंध असल्यामुळे साहित्याच्या समृद्धीसाठी एक नवीन दृष्टीकोन निर्माण होईल..

**PO6: Self- directed and life –long learning**

CO2 : दलित साहित्यातील कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन  इत्यादी विविध साहित्याचा अभ्यासातून विविध कालखंडातील बदलत्या समाजजीवनाचा झालेला परिणाम यांचा अभ्यास होईल.व स्वानुभव चित्रित करतील.

*********************